'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)**

**मराठी विभाग**

मराठी विषयासाठी सादर करण्यात आलेला शोधप्रकल्प

शीर्षक

# लोकनाट्य तमाशा - बतावणी

मार्गदर्शक

**प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर**

**अभ्यासक**


कु. चौगले तेजश्री मधुकर (बी. ए. भाग ३)

कु. भोसले सानिका सुभाष (बी. ए. भाग ३)

कु. आंबी श्रीधर कृष्णात (बी. ए. भाग ३)

कु. चरापले स्वराज सुरेश (बी. ए. भाग ३)

कु.चव्हाण समृद्धी नंदकुमार (बी. ए. भाग ३)

कु. चौगले ऋत्विक कृष्णात (बी. ए. भाग ३)


**मार्च, २०२३**

# • अनुक्रमणिका •

## लोकनाट्य तमाशा : बतावणी


| अ.क्र | लोकनाट्य तमाशा : बतावणी | पृ.क्र |
|---|---|---|
| 1) | प्रस्तावणा. | 01 |
| 2) | लोकनाट्य तमाशा : बतावणी. | 02 |
| 3) | महाराष्ट्राचे लोकनाट्य : उगम व विकास | 03 |
| 4) | तमाशा वग : परंपरा व स्वरूप | 04 |
| 5) | महाराष्ट्राचे लोकनाट्य : उगम व विकास | 05 |
| 6) | समारोप | 07 |

# • प्रस्तावना •

माझ्या प्रकल्प लेखनाचा विषय लोकनाट्य तमाशा बतावणी हा विषय असून त्या मध्ये लोकनाट्य उगम व विकास, बतावणी बतावणीचा नमुना या मुद्द्यांच्या आधारे मांडणी केले आहे. बतावणी फार्सला बतावणी, संपादणी असेही संबोधले जाते. वास्तविक पाहता हा रंगभूमीवर सादर होणारा प्रकार. नाटकाची लांबी वाढविण्यासाठी किंवा गंभीर नाटकात प्रेक्षकांना हसविण्यासाठी फार्स रंगभूमीवर होऊ लागले. समाजातील व्यंगावर यामधून बोट ठेवले.

# • प्रतिज्ञापत्र •

मी . कु . तेजश्री मधुकर चौगले . वर्ग बी . ए . भाग ३ विषय मराठी असून असे लिहून देतो की . एका लोकनाट्य तमाशा : बतावणी हा प्रकल्प डॉ . एकनाथ आळवेकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वतः अभ्यास करून लिहिला आहे . तो इतर कोणत्याही पदवी - परिक्षासाठी सादर केलेला नाही .

तेजश्री मधुकर चौगले .
(अभ्यासक)

स्थळ : कोल्हापूर

दि : २० / ०४ / २०२३

# • ऋणनिर्देशांक •

मी तेजश्री मधुकर चौगले. माझा विवेकानंद कॉलेज कोल्हापूरमध्ये वर्ग बी.ए. भाग ३ व विषय मराठी असून माझा सदर शोधप्रकल्प - लोकनाट्य तमाशा - बतावणी हा आहे.

प्रस्तुत लोकनाट्य तमाशा - बतावणी हा प्रकल्प लिहित असताना पर्यायी मला अनेकांचे मार्गदर्शन आणि प्रकल्पास अनुकूल मदत लाभली. त्यामध्येही काहि न विशिष्ट व्यक्तिंचा विशेष उल्लेख प्रस्तुत प्रकल्पामध्ये मी करु इच्छिते.

या उल्लेखनिय व्यक्तींशिवाय सदर शोधप्रकल्प अपूर्ण हस्ते. प्रस्तुत प्रकल्पासाठी मला विवेकानंद कॉलेजमधील मराठी विभागातील प्रा. डॉ. प्रदिप पाटील सर डॉ. स्वप्नील बुचडे सर व ~~माझ्या~~ डॉ एकनाथ आळवेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

Tejashree

- तेजश्री मधुकर चौगले

# लोकनाट्य तमाशा : बतावणी

बतावणी =

रंगबाजी - गण, गवळण, झाल्यावर सुरवात होते. रंगबाजीला, हा एक प्रकारचा छोटासा फार्सच असतो. कुठलेही एखादे कथानक निवडुन त्यात कल्पना विस्ताराने रंग भरला जातो. घटनेची गुंतागुंत करणे. खऱ्याचे खोटे आणि खोट्याचे खरे करणे आणि त्यामधुन विनोद निर्मिती करणे असा प्रकार रंगबाजीमध्ये असतो. या घटनानाट्या - बरोबरच लावण्य छक्कड कटाव व झगड्यांची रेलचेल रंगबाजीमध्ये असते.

# महाराष्ट्राचे लोकनाट्य : उगम व विकास

रंगबाजीमध्ये लावण्यांबरोबर आणखी एक गायकीचा प्रकार पूर्वी अतिशय लोकप्रिय असायचे ते म्हणजे कटाव. कटावात छक्कड प्रमाणेच स्त्रीच्या रूपाचे सौंदर्याचे वर्णन केलेले असते. त्याचप्रमाणे त्यास प्रास, अनुप्रास यमक यांची रेलचेल असते.

एक कटाव पहा -

"जागी पाहून कमनीचा शेष ग
तुला पाहून पडेना मला झोप....
छक्कडीचा नमुना असा_
तो - हे रूपसुंदरी राजसबाळी।
नको पुढें जाऊं भराभरा ।।
वेडा मी झालों पाठिं लागलों।
नको मनामधिं धरू कुर्रा ।।
ती - जरा बेतानंवाग सदा माझ्या मागं।
कशासाठी हिंडतोस गरागरा।
रे खट्याळ आहे माझा नवरा ।।
कुणितरी येईल, अवचित पाहिल।
सांगत जाईल माझ्या दिरा।
रे खट्याळ आहे माझा नवरा ।।
रंगबाजी सुरू राहते ती अशी.।

हैबतराव = (मोठ्याने हाक मारतो) म्हैपतराव अव म्हैपतराव...
म्हैपतराव = (हैबतरावच्या मागे आहे.) का वरडताय उगा. तुमच्या मागचं हाय की मी हतं.
हैबतराव = माझ्याच मागं हायसा व्हय तुम? मला वाटलं

गेला असाल गवळणींच्या मागनं तुमच्या काय भरोसा न्हाई म्हैपतराव.

म्हैपतराव = हैबतराव खरं हाय तुमचं म्हणनं पर इकडं पब्लिक हत जमलं असतांना या रशिकजणांना सोडुन गवळणींच्या मागणं जायला मी काय म्हैस हाय?

हैबत = छा! छा! तुमाला कोन म्हैस म्हणल आनं असं बगा म्हैपतराव, तुमाला जर म्हैस म्हणायचं ठरलं.

म्हैपत = ठरलं? कोकणं ठरविणार त्ये?

हैबत = म्हंजी आपल्या लोकांनी

म्हैपत = तर काय हुईल?

हैबत = होतय काय खरं? पर तुम्हाला म्हैस म्हट-ल्यावर रेडा म्हणायला कुणी-हायचं न्हाई

म्हैपत = खरंच कुणी-हायचं न्हाई?

हैबत = आइच्यान

म्हैपत = मग बापाच्यानं भी तुम्हाला सांगतो हैबत-राव तुमाला लोक अदुगरपासूनच रेडा जर न्हाई तरी रेडकू म्हनत्यात कारण तुमचा आवाज तसा हाय

हैबत = काय म्हनत्यात मला लोक?

म्हैपत = खरं हाय त्ये सांगितलं खरं कधीच खोटं नसतं

हैबत = आनू पब्लिक बी लई जमलं हाय तवा सांगायची गोष्ट अशी की ह्या पब्लिकला खुष करून टाकणारा वग काडा ह्या अन्नदात्यांची आपल्या हातून चांगली सेवा झाली पाहिजे.

तमाशातील वग : परंपरा व स्वरूप :

लावण्यामध्ये कितीही विविधता आणली तरी तस्म-नतास तमाशाचा फड रंगविणे शाहिरांना कठिण गेले आहे. म्हणुन पेशवाईनंतर कथात्मक लावणी लिहुन त्यांनी नाट्यात्मक सादरिकरण करण्याची पद्धत शाहिरांनी रूढ केली असावी संपुर्ण कथा गाऊन व अभिनीत करून दाखविली तर त्याचे स्वरूप थोडेसे नाटकासारखे होते. कथानक सांगणाऱ्या अख्यानक वग-नाट्याचा प्रारंभ १९व्या शतकात उत्तरार्धात झाला. उमा बाबाने मोहना - बटाव हा पहिला वग लिहला त्यानंतर पठ्ठे बापूरावांनी बरीच वगरचना केली. तमाशात आख्यनक लावणी म्हणुन तिचे नाट्यरूप सादर करण्याचा प्रकार १९व्या शतकात उत्तरार्धात सुरू झाला हे निश्चित मोहना - बटाव हा मराठीतील उमा बाबाने मांग याने लिहिलेला पहिला वग होय. त्यापुर्वी आख्यानस्वरूपात लावणीची परंपरा आढळत नाही

वग म्हणताना कथाकाव्याची किंवा कथानाट्याची नांदी टाकण्याची पद्धत तमाशात आढळते. त्यालाच तोडा टाकणे असे म्हणतात. त्यात आख्यानाच्या संक्षेपाने कथानक सांगणे त्याचप्रमाणे पात्रपरिचय देणे असा भाग असतो.

# महाराष्ट्राचे लोकनाट्य - उगम व विकास :

अशा प्रकारच्या प्रारंभ करून आख्यान गायिले जाते आणि एका एका प्रवेशाच्या स्वरूपात सादर केले जाते. प्रसंग संपला तर पुन्हा तोड्याचे समूहगान होते. महाराष्ट्रात तमाशाची दीर्घ परंपरा आढळते. त्याचे आजचे स्वरूप मात्र पेशवाईतच सिद्ध झाले.

अख्यान गीते आणि त्याचे सादरीकरण याची स्पष्ट परंपरा मात्र तमाशाच्या रंगभुमिवर गेल्या शतकाच्या मध्यापासूनच दिसते. मुक्त लवचिक आणि समयस्फूर्त बतावणी असलेला कथागीतांच्या सादरीकरणाच्या नाट्यप्रयोग पुढे फारच लोकप्रिय झाला. कथेतील संवादनिर्मितीही बेक लागली. तेव्हापासून वग हा स्वतंत्र वाङ्मय प्रकार म्हणूनच चर्चित जाऊ लागला. वगाचे सादरीकरण अत्यंत वैशिष्ट्यपुर्ण असते तमाशाच्या रंगपीठाजवळ चोहेबाजुंनी प्रेक्षक असतो. एखाद्या पात्राच्या मुखातुन कथेतील स्थळाचे वर्णन केले जाते. व कल्पना केली जाते. लोकभुमिवर चालत असलेल्या संकेतानुसार त्याच रंगभुमीवर गोल फिरून स्थळ बदलते. काळाचा बदल दर्शविण्यासाठी देखिल परंपरेने चालत आलेले संकेतांनीच योजना केली आहे. संवादात पुनरावृत्ती करणे कृतींचेही आवर्तन करणे. म्हणूनच अब. हे. हे असे हाकारणे, पात्रांनी स्वतःची जागा बदलणे हे सर्वच लोकरंगभूमीवरील संकेतानुसार घडले.

तमाशाच्या वगात सरदार सोंगाड्या नाची किंवा नाच्या आणि एखादा झीलकरी असे ४.५ लोक ओळीपाळीने कथेतील निरनिराळ्या पात्रांच्या भूमिका करतात. भूमिका बदलताना संपुर्ण वेशभूषा बदलत नाही. केवळ एखाद्या बाह्य वस्तुच्या सहाय्याने भूमिका बदलण्याचा अभ्यास केला जातो. जसे - असलेल्या पुरूषाच्या पोशाखावरूनच साजि रंगवून स्त्रीचे रूप होते

# • समारोप •

'लोकनाट्य तमाशा : बतावणी' या प्रकल्पाच्या अभ्यास. 1) लोकनाट्य तमाशा - बतावणी
2) महाराष्ट्राचे लोकनाट्य - उगम व विकास.
3) तमाशा वग - परंपरा व स्वरूप
4) महाराष्ट्राचे लोकनाट्य - उगाव व विकास.

या प्रकल्पाच्या आधारे बतावणी व वग या क्रम हे तमाशातील घटक समजावून घेता आले.